मुंबई तरुण भारत
Pune Edition | 2025-07-06 | Page- 2
epaper.mahamtb.con

# सायबर सिक्युरिटी प्रकल्पाचा श्री गणेशा

**पुणे :** 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' प्रकल्पावर आधारित 'ट्रेनिंग सेशन महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थे'च्या 'के. बी. जोशी इन्स्टिट्यूट ऑफ इन्फर्मेशन टेक्नोलॉजी' येथे राबवण्यात आले. या सेशनकरिता 'क्विक हिल फाऊंडेशन'चे सीएसआर (कॉर्पोरेट सोशल रेस्पॉन्सिबिलिटी) कार्यकारी दीपु सिंग आणि गायत्री केसकर यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच, अनुपमा काटकर, अजय शिर्के, साक्षी लवंगारे यांचे सहकार्य लाभले. या सेशनमध्ये महाविद्यालयाच्या प्राचार्या अनघा वैद्य, विभागप्रमुख रुपाली सराफ, कल्याणी नामजोशी, शिक्षक प्रतिनिधी मनाली सपकाळ व २० निवडलेल्या विद्यार्थिनी उपस्थित होत्या. या सेशनचा मूळ उद्देश या प्रकल्पात होणाऱ्या वेगवेगळ्या कार्यांचा एक नकाशा स्वरूप माहिती देणे हा आहे. 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या प्रकल्पाची सुरुवात असे संबोधून हे सेशन संपन्न झाले.

Powered by Bharati Web